## SOCIAL MOVEMENTS IN POST INDEPENDENCE INDIA

**Editor**

Shri. Rajendra K. Deshmukh

**Publisher**

Principal Dr. R. B. Bawdhankar
Yashwantrao Chavan Mahavidyalaya, Pachwad,
Tal. Wai, Dist. Satara

**Printer**

Siddhivinayak Enterprises
322 Yadogopal Peth, Satara

© Yashwantrao Chavan Mahavidyalya,
Pachwad, Tal. Wai, Dist. Satara.

First Edition : Feb 2016
Publishing No. ISBN : 978-93-5254-328-1

Price : 300/-

Note : **Editorial Board and Publisher may not agree with the opinions, expressed by the Researchers. The opinion expressed are their own.**

# Social Movements In Post Independence India

**Editorial Board**

**Chairman**

**Dr. R. B. Bawdhankar**

Principal,
Yashwantrao Chavan Mahavidyalaya, Pachwad.

**Editor**

**Shri. Rajendra K. Deshmukh**

Associate Professor and Head
Department Of History
Yashwantrao Chavan Mahavidyalay, Pachwad.

**Members**

**Shri. R. G. Bhise**
**Dr. S. P. Shinde**
**Dr. D. B. Masal**
**Dr. A. S. Tike**
**Dr. S. S. Bodakhe**
**Shri. J. C. Sawant**

# अनुक्रमणिका


१. स्वातंत्र्योत्तर भारतातील कष्टकरी शेतकऱ्यांच्या चळवळी
डॉ.जी.एस.महाडीक १

२. महाराष्ट्रातील खंडकरी शेतकऱ्यांची चळवळ
प्रा.डॉ.एस.एम.गावडे ८

३. शेतकरी चळवळीतील स्थित्यंतरे
प्रा.बी.के.सांगळे. १२

४. भाई प्रा.एन.डी.पाटील यांचे शेतकरी चळवळीचे नेतृत्त्व
प्रा.डॉ.एस.पी.शिंदे २०

५. स्वातंत्र्योत्तर भारतातील शेतकरी चळवळ
प्रा.डॉ.दत्तात्रय मल्हारी चौधरी २३

६. स्वातंत्र्योत्तर काळातील कष्टकरी वर्गाची चळवळ
प्रा.डॉ.ए.एस.टिके २७

७. बालकामगारांच्या शिक्षणासाठीची चळवळ : अवनि
डॉ. सुप्रिया चद्रशेखर खोले ३०

८. भारतीय सामाजिक समतेचे प्रतिक भूदान चळवळ
डॉ.मधुकर विठोबा जाधव ३६

९. भूदान चळवळ आणि शे.का.पक्षाची भुमिका
प्रा. मनिषा श्रेणीककुमार पाटील ४२

१०. **Bhoodan Movement**
Shri.Shankar Namdev Gejage Shri.Bhosale Sanjay Hanmant ४८

११. हैदराबाद संस्थानातील राजकीय परिस्थिती व विलिनीकरणानंतरची विद्यार्थी चळवळ (मराठवाड्याच्या संदर्भात सन् १९४८-१९५४)
प्रा. गीतांजली बोराडे ५२

१२ कोरेगाव तालुक्यातील सत्यशोधक समाज
सहा. प्रा.क्षत्रिय कमलसिंग विक्रमसिंग ६२

१३. सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळ
प्रा.जयपाल चंद्रकांत सावंत ६९

१४. वाईच्या ब्राह्मोसमाजाचे स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक कार्य
प्रा.डॉ.दत्तात्रय ज्ञानदेव कोरडे ७३

१५. दलित चळवळीतील दलित पँथरचे कार्य
प्रा.डॉ.संतोष तुकाराम कदम ७८

१६. दलित पॅन्थर: स्वातंत्र्योत्तर भारतातील एक पुरोगामी सामाजिक चळवळ
प्रा.डि.के.रसाळ / प्रा.के.एस.शिंदे ८५

१७. आंबेडकरी चळवळ आणि डॉ.गंगाधर पानतावणे
प्रा.डॉ.मल्हारी धोंडीबा मसलखांब ९१

१८. १९५६ ची धर्मांतर चळवळ : एक अभ्यास
प्रा. उर्मिला न.क्षीरसागर ९७

१९. मानवी हक्क आणि स्त्रीवादी चळवळीची भूमिका
प्रा.डॉ.चंपाताई श्रीरंग बोधले १०१

२०. स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री चळवळी
डॉ.अजितकुमार दादासो जाधव १०६

२१. स्वातंत्र्योत्तर भारतातील स्त्री चळवळींची भूमिका
प्रा. राजेंद्र कृष्णा देशमुख १११

२२. महाराष्ट्रातील अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीतील नरेंद्र दाभोळकर यांचे योगदान
श्री.उत्तम सर्जेराव आवारी ११४

२३. 'भूत' ही एक अंधश्रध्दा
प्रा.एल.डी.आंदे ११८

२४. अंधश्रध्दा निर्मूलन चळवळ
डॉ.दत्तात्रय पां.खराडे १२४

# ७. बालकामगारांच्या शिक्षणासाठीची चळवळ : अवनि

**डॉ. सुप्रिया चद्रशेखर खोले,**
**चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी**
**तालुका हातकणंगले, जि.कोल्हापूर**

भारताने एकविसाव्या शतकात प्रवेश केला आहे, मात्र कित्येक वर्षापासुन भारताला भेडसवणाऱ्या अनेक सामाजिक समस्या आजही जशाच्या तशा आहेत. अजूनही त्या पूर्णपणे सोडविणे आपल्याला शक्य झालेले नाही. अशीच एक गंभीर सामाजिक समस्या म्हणून बालकामगार पध्दतीचा उल्लेख करावा लागतो. कडक कायदे करुनही बालकामगार समस्येचे आपण उच्चाटन करु शकलेलो नाही. राज्यात मोठ्या प्रमाणात बालकामगार अनेक धोकादायक क्षेत्रात काम आजही करत आहेत. त्यांची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक केली जाते आहे. ही मुले शिक्षणापासून पर्यायाने सामाजिक प्रगतीपासूनही वंचित राहत आहेत.

**शोधनिबंधाचे उद्दिष्ट :** अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत. मात्र भारतातील कोट्यावधी मुलांच्या अन्न, वस्त्र, निवारा या गरजाही पूर्ण होत नाहीत. शिक्षणापासून तर ते वंचितच राहतात. कारण लहानपणापासूनच त्यांना जगण्यासाठी काम करावे लागते. कोल्हापूर जिल्ह्यातील बालकामगारांसाठी 'अवनि' ही संस्था काम करते. या संस्थेचे स्वरुप, कार्य याचा आढावा घेणे हा या शोधनिबंधाचा प्रमुख उद्देश आहे. अवनि गेली पंचवीस वर्ष बालकामगारांना विशेषतः वीटभट्ट्यांवर काम करणाऱ्या तसेच ऊसतोड मजुरांच्या मुलांना शिक्षण मिळावे यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत. शिक्षणापासून दूर असणारी हजारो मुले अवनिच्या प्रयत्नामुळे शिक्षण प्रवाहात आली आहेत. अवनिच्या या कार्याचा ऐतिहासिक आढावा उपलब्ध संदर्भ साधनांच्या आधारे सदर शोधनिबंधात घेतला आहे.

**बालकामगार अर्थ, स्वरुप :** उपजीविकेसाठी काम करणाऱ्या अठरा वर्ष वयाखालील मुलांना बालकामगार असे म्हटले जाते. बालहक्काच्या मसूद्यानुसार मुलांच्या सामाजिक, शारीरिक, नैतिक अथवा मानसिक विकासात बाधा येईल असे कोणतेही काम म्हणजे

 ISBN : 978-93-5254-328-1

बालमजुरी होय.[१] विविध सर्वेक्षणातून असे आढळून आले आहे की जी मुले शाळेत जात नाहीत, ती बालकामगार म्हणून काम करतात. शहरातील अशी मुले कचरा वेचण्याबरोबरच, गॅरेज, हॉटेल, वीटभट्टी, खाणकाम, कारखाने इत्यादी ठिकाणी कामे करतात, तर मुली मोलकरणी म्हणून काम करायला लागतात. आई वडील शेतात राबतात त्यावेळी आपल्या लहान भावंडांना सांभाळणाऱ्या मुलीही एक प्रकारे बालकामगारच असतात. बालकामगार पध्दती मागे अनेक कारणे आहेत.पालकांची गरीबी, पालकांचे सतत होणारे स्थलांतर, शिक्षणाविषयी असणारी अनास्था, पालकांची व्यसनाधिनता याचबरोबर शिक्षणाची सोय नसल्यामुळेही मुले कामाला जातात. अशा मुलांसाठी काम करणाऱ्या त्यांच्यात जागृती घडवून आणणाऱ्या संघटनांचा अभाव हेही खूप महत्वाचे कारण आहे. संपूर्ण भारताचा आढावा घेतला तर जवळजवळ सर्वच क्षेत्रात बालकामगार काम करत आहेत. एका सर्वेक्षणानुसार जवळपास दोन कोटी बालकामगार आज भारतात आहेत.[२]

**अवनिची स्थापना :** बालकामगार म्हणून काम करणाऱ्या मुलांची फरफट थांबावी, त्यांना त्यांचे हक्क मिळावेत, विशेषतः त्यांना शिक्षणाचा हक्क मिळावा यासाठी कोल्हापूरात जेष्ठ समाजसेवक श्री.अरुण चव्हाण यांच्या प्रेरणेने अनुराधा भोसले यांनी १९९५ साली अवनिची स्थापना केली. अनुराधा भोसले यांचे बालपण अतिशय गरीबीत गेले, धुण्याभांड्यापासून ते संडास साफ करण्यापर्यंत सर्व कामे त्यांना करावी लागली. हे करत असतांना त्यांना शिक्षण घेण्याची संधी मिळाली. त्यांनी बी.एस.डब्ल्यु. ही पदवी मिळवली. हेच शिक्षण त्यांच्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट ठरले. सुरवातीला त्या सांगलीचे समाजसेवक श्री.अरुण चव्हाण यांच्याबरोबर काम करत होत्या. त्यांनी अंधश्रध्दा निर्मूलन समिती, रंकाळा बचाओ, महिला संघर्ष अशा चळवळीतून कामे केली. नंतर श्री.अरुण चव्हाण त्यांच्या पाठावणीने त्या कोल्हापूरला आल्या. कोल्हापूर परिसरातील शाळा बाह्य मुलांना शिक्षण प्रवाहात आणणे या उद्दिष्टाने त्यांनी 'अन्न–वस्त्र–निवारा' म्हणजेच 'अवनि'ची सुरवात केली.[३] कोल्हापूर जिल्ह्यात पश्चिम भागात अनेक वीटभट्ट्या आहेत. जेथे काम करण्यासाठी महाराष्ट्रातील विविध भागातून त्याचप्रमाणे परराज्यातूनही अनेक मजुर कुटुंबे येतात. काम पूर्ण झाले की परत आपल्या गावी निघून जातात. त्याचप्रमाणे ऊसतोड मजूर आणि बांधकाम मजूरांचे ही येणे जाणे सुरु असते. या कुटुंबातील मुलांचेही स्थलांतर होत राहते आणि ती शाळेत जाऊ शकत नाहीत. हे पाहून अवनिने हाच भाग आपले कार्यक्षेत्र म्हणून निवडला.[४]

**अवनिचे कार्य :** १९९५ मध्ये अवनिच्या कार्याला सुरवात झाली. या काळात कोल्हापूर परिसरात मोठया प्रमाणावर स्थलांतरित आले होते. अत्यंत गरीबीत जगणाऱ्या या लोकांची मुले दिवसभर भंगार गोळा करत आणि रात्री रस्त्यावर झोपत. अवनिने अशा

ISBN : 978-93-5254-328-1 

जवळजवळ २२ ते २३ मुलांना एकत्र करून त्यांना चांगल्या सवयी आणि आरोग्य शिक्षणाचे धडे द्यायला सुरवात केली. सरकारी शाळात त्यांना प्रवेश मिळवून दिला हा प्रयोग यशस्वी झाला ही मुले नियमितपणे शाळेत जाऊ लागली. [५] यानंतर संस्थेच्या कामाने वेग घेतला.संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात आसपासच्या भागातील हजारो मुले शाळाबाह्य असल्याचे आणि बालकामगार म्हणून राबत असल्याचे लक्षात आले. यांच्यासाठी अवनिने काम करायला सुरुवात केली. अवनिच्या प्रयत्नाने भंगार गोळा करणारी अनेक मुले शाळेत जाऊ लागली. अशी मुले आणि त्यांच्या पालकांनाही त्यांच्या हक्काची जाणीव करुन देण्याचा प्रयत्न अवनिने केला.[६] सरकारने बालकामगार प्रथेच्या विरोधात कायदे केलेले असूनही अनेक ठिकाणी मुलांना कामावर ठेवले जाते. सरकारने यासाठी जिल्हा पातळीवर धाडसत्र समितीची नियुक्ती केली. या समितीच्या अनुराधा भोसले सदस्य राहिल्या. ज्या ठिकाणी बालकामगार काम करतात त्या ठिकाणी समितीमार्फत धाडी टाकून मुलांना सोडविले जाते आणि बालकल्याण समितीमार्फत त्यांचे पुनर्वसन केले जाते. या मुलांना शाळेतही दाखल करण्यात येते. कोल्हापूरमध्ये फुलांचा व्यवसाय मोठया प्रमाणावर चालतो. या कामासाठी राजस्थान तसेच अन्य ठिकाणाहून मुलांना फुलांची तोरण, माळा तयार करण्यासाठी आणले जात होते,हे लक्षात आल्यावर, काही व्यापाऱ्यांना अवनिने समज दिली, तरीही ते ऐकेनात, प्रयत्न करून जवळपास पाच-सहा मुलांची सुटका त्यांनी केली. फुलांचे हार, तोरणे सुई दोऱ्यांने सतत शिवत असताना सुई टोचून मुलांच्या हाताच्या बोटांची अक्षरशः चाळण झाली होती. या मुलांना त्यांच्या गावी नेऊन त्यांच्या आई-वडिलांकडे पोहोचवले, परंतु त्यांनीही मुलांना विकून दलालाकडून पैसे घेतले असल्यामुळे ते मुलांना त्यांच्याकडे ठेवून घ्यायला तयार नव्हते. मग तिथल्या कांही बालकल्याण समित्यांच्या मदतीने त्यांना तिथल्या शाळेत दाखल केले. आज इथल्या फुलांच्या व्यवसाय कामात एकही बालकामगार नाही.[७]

**अवनिच्या बालवाड्या आणि साखरशाळा :** अवनिने राबविलेला अत्यंत महत्वाचा प्रकल्प म्हणजे वीटभट्टी व साखरशाळा प्रकल्प. अवनि संस्थेने वीटभट्टीवरील कामगार, स्थलांतरीत ऊसतोड कामगार, बांधकाम व्यवसायातील स्थलांतरीत मजूर आणि महामार्गावरील धाब्यावरील बालकामगारांचे सप्टेंबर २०१४ मध्ये सर्वेक्षण केले होते. यामध्ये शून्य ते तीन वर्ष वयोगटातील आणि सहा ते चौदा वयोगटातील शिक्षणापासून वंचित असणाऱ्या १७०० बालकामगारांची नोंद झाली. या सर्व बालकांना अवनि संस्थेने त्यांच्या बालगृहात तसेच संबंधित ठिकाणच्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये प्रवेश देण्यासंदर्भात पुढाकार घेतला. यातील कांही बालकामगार जिल्हा परिषदेच्या वाकरे, दोनवडे, खुपिरे, सरनोबतवाडी तसेच शिरोळ तालुक्यातील उदगांव आणि चिंचवाड येथील शाळेमध्ये शिकत आहेत. शून्य ते तीन


ISBN : 978-93-5254-328-1

वर्ष वयोगटातील बालकामगारांच्या शिक्षणासाठी अवनि संस्थेने कोल्हापूर जिल्हयातील १४ ठिकाणी हंगामी बालवाड्या सुरु केल्या. यामध्ये ७०० मुले शिक्षण घेत आहेत.[८]

अवनि संस्थेने साखरशाळा सुरु केल्या. स्थलांतरीत कामगारांच्या उदा. ऊसतोड मजुर, वीट भट्टी मजूर इ. मुलांसाठी कसबा बावडा येथील राजाराम साखर कारखाना परिसरातील ४५ आणि कुडित्रे येथील कुंभी-कासारी सहकारी साखर कारखाना परिसरात ६ ते १४ वयोगटातील ४७ बालकांनी या हंगामी साखरशाळांमध्ये शिक्षण घेतले. दरवर्षी साखर गाळपाच्या हंगामात या साखर शाळा चालविल्या जातात.[९] ही मुले आपल्या कुटुंबाबरोबर परत गावी जातात त्यावेळी त्यांचे शिक्षण सुरु राहील याकडे अवनि लक्ष देते.

**निवारागृह :** अवनिला असे दिसून आले की बालकामगार म्हणुन काम करणारी अनेक मुले मुली निराधार आहेत. अशांसाठी २००४ मध्ये अवनिने कोल्हापुरातील जिवबा नाना पार्क येथे निवारागृहाची स्थापना केली. निवारागृहाची उभारणी करताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. स्थानिकांचा विरोध सहन करावा लागला. मात्र अवनिने नेटाने हे काम पुढे नेले. आज या निवारागृहात अठरा वर्षाखालील चाळीस निराधार मुला मुलींची राहण्याची सोय करण्यात आली. यांचा सर्व खर्च संस्थेमार्फत केला जातो. कोल्हापूरातील विविध शाळांमध्ये ही मुले मुली शिकतात. अवनिच्या प्रयत्नामुळेच शाळा बाह्य असणारी मुले शिक्षण प्रवाहात आली आहेत.[१०]

**अवनिला मिळणारी मदत :** गेली एकोणीस वर्ष अवनिचे कार्य अविरतपणे सुरु आहे. आतापर्यत जवळ जवळ ४००० बालकामगार मुला मुलींना मुक्त करून त्यांच्या शिक्षणाचा हक्क अवनिने त्यांना मिळवून दिला. हे सर्व कार्य पुर्णपणे समाजाच्या मदतीवर सुरु आहे. कोणत्याही प्रकारचे सरकारी अनुदान अवनिला अद्यापही मिळाले नाही. छोटे मोठे व्यावसायिक आपल्या श्रमातील दररोजचा एक रुपया बाजूला काढून ठेवतात आणि तो संस्थेला देतात. अनेक व्यक्ति-संस्थाकडूनही मदत दिली जाते. येथे राहणारी मुले मुली प्रिंटिंग, आकाश कंदील अशा वस्तू करुन विकतात आणि त्यातून ही पैसे मिळविले जातात.[११] श्री. अरुण चव्हाण यांच्यामुळे महात्मा गांधीचे नातू डॉ. तुषार गांधी अवनिच्या संपर्कात आले आणि कायमचे अवनिशी जोडले गेले. त्यांनी स्थापन केलेल्या 'गांधी वर्ल्डवाईड एज्युकेशन' या संस्थेमार्फत अवनिस मदत केली. परराष्ट्रातील समाजकार्याची आवड असणाऱ्या अनेक व्यक्ती तुषार गांधीमुळे अवनिशी जोडल्या गेल्या. अमेरिकेतील टेक्सासमधील रहिवासी स्कॉट कफोरा हा व्यवसायाने आर्किटेक्ट असणारा तरुण तुषार गांधी बरोबर भारतात आला. त्याने अवनिस भेट दिली. अमेरिकेला परत गेल्यावर त्याने नोकरी सोडली, घर विकले आणि उर्वरीत आयुष्य अवनिसाठी देण्याचे ठरविले. हा तरुण आपली

ISBN : 978-93-52(   )28-1

लाखो रुपयांची नोकरी सोडून २०१० पासुन कोल्हापूरात येवून अवनिसाठी काम करत आहे. गांधीवादाने प्रभावित असलेला स्कॉट कर्कोरा अतिशय साधे आयुष्य जगतो आहे. या मुलांच्या शिक्षणासाठी तो कार्यरत आहे. स्कॉट आज अवनिसाठी पर्यावरणपूरक इमारत स्वस्तात बांधण्याचा आराखडा तयार करत आहे.[१२] गोकुळ दुध संघाचे संचालक अरुण नरके यांनीही अवनिस विविध प्रकारे मदत केली. संस्थेच्या निवारागृहात राहणाऱ्या मुलांसाठी गोकुळ दूध संघामार्फत दररोज १० लिटर दूध दिले जाते.[१३] अशा अनेक दात्यांच्या मदतीवर अवनि पुढे वाटचाल करत आहे.

**समारोप :** समाजाचे भावी आधारस्तंभ असणारी मुले-मुली शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनणे आवश्यक आहे. यासाठी त्यांना योग्य ते शिक्षण दिले गेले पाहिजे. मात्र आजही भारतातील हजारो मुले-मुली शिक्षणापासून वंचित आहेत. खेळण्या-बागडण्याच्या वयात ती कामगार म्हणून राबत आहेत. अशाच शाळाबाह्य गरीब-निराधार मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे अवनिचे प्रयत्न अतिशय महत्वाचे आहेत. अवनिच्या प्रयत्नांमुळे कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक बालकामगार मुले मुली शिक्षण घेत आहेत. अनेक निराधार मुला-मुलींनाही अवनिच्या रुपाने आधार मिळाला आहे. इतर जिल्ह्यात अशा प्रकारचे काम करणारी स्वयंसेवी संस्था नसल्यामुळे तेथील अनेक बालकामगार शिक्षणापासून वंचित राहिले आहेत. मुलांमुलीसाठी भविष्यात व्यावसायिक शिक्षण आणि क्षमताधिष्ठीत अभ्यासक्रम सुरु करण्याची त्याचप्रमाणे निवारागृहाची व्याप्ती वाढुन स्वतःची शाळा सुरु करण्याची अवनिची योजना आहे. या सर्व गोष्टींसाठी सरकारी अनुदान त्याचप्रमाणे समाजाच्या आर्थिक पाठबळाची गरज आहे. अवनिसारख्या संस्था वाढण्यासाठी सरकारने विशेष तरतुद केली पाहिजे. जेणेकरुन अधिकाधिक शाळाबाह्य मुले शिक्षणाच्या प्रवाहात येतील. अवनिमार्फत राबविले जाणारे प्रकल्प उदा. साखरशाळा, राज्यात इतरत्र राबविता येतील का याकडेही विशेष लक्ष दिले पाहीजे तरच 'विकसित भारत' हे आपले स्वप्न साकार होईल.

**संदर्भ :**


१. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), विश्वकोश खंड नं. ११, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, १९८२, पा.नं. ४४३.

२. खरे वंदना(लेख), बालमजूरीमुळे हरवतेय बालपण, दै. प्रहार, मुंबई आवृत्ती १२ जुन २०१४.

३. भोसले अनुराधा (लेख), त्यांनाही जगू द्या माणूस म्हणून, दै.प्रहार ८ मार्च २०१४.

४. किर्त्ता, दै.लोकसत्ता, २५ ऑगस्ट २०१३.

५. भोसले अनुराधा (लेख), उपरोक्त.




ISBN : 8-93-5254-328-1


६. दै. लोकसत्ता, २५ ऑगस्ट २०१३.

७. भोसले अनुराधा (लेख), उपरोक्त.

८. माहितीपत्रक अवनि, दै. लोकमत कोल्हापूर आवृत्ती, ३० एप्रिल २०१५.

९. मुलाखत : श्री.अमोल कवाळे (शिक्षक अवनि), १० ऑक्टोबर २०१५.

१०. चव्हाण अरुण, अनुराधा भोसले (संपा.), स्मरणिका प्रकाशाची वीस वर्ष, पृ. ४०,४१.

११. मुलाखत : उपरोक्त.

१२. ई.सकाळ २१ ऑगस्ट २०१३; काशिद सुधाकर (लेख), साहेब पडला महात्मा गांधीच्या प्रेमात, दै. सकाळ कोल्हापूर आवृत्ती, २ ऑक्टोबर २०१३.

१३. चव्हाण अरुण, अनुराधा भोसले (संपा.), उपरोक्त पृ. ३-४.


ISBN : 978-93-5254-?8-1





Rayat Shikshan Sanstha's

# Yashwantrao Chavan Mahavidyalaya, Pachwad

**Tal. Wai, Dist. Satara (Maharashtra)**

(Affiliated to Shivaji University, Kolhapur)

NAAC Reaccredited 'B' Grade with CGPA 2.28

## NATIONAL CONFERENCE

# CERTIFICATE

This is to Certify that ~~Shri.~~/Smt./Dr./Prof. ....Supriya Chandrashekhar Khole..................... of ............C. S. Shendure College, Hupari........................................ has participated / worked as a Resource Person / Chairperson / Rapporteur / Member of organizing committee in the Two Day UGC Sponsored National Conference on **"Social Movements In Post-Independence India"** organized by Department of History, Yashwantrao Chavan Mahavidyalaya, Pachwad on $17^{th}$ and $18^{th}$ October, 2015. He / She presented paper entitled ."बालकामगारांच्या शिक्षणासाठीची चळवळ : आवाहन"
..........................................................................................................................

| | | |
|---|---|---|
| **Shri. R.K. Deshmukh** | **Shri. R.G. Bhise** | **Dr. R. B. Bawdhankar** |
| **Convener** | **Co-Convener** | **Principal** |